ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ५ जून, १९५७ | अंक २१

## विविध माहिती

**भारताला येणारे अमेरिकन प्रवासी**—भारताला येणाऱ्या हौशी अमेरिकन प्रवाशांच्या संख्येंत उत्तरोत्तर वाढ होत आहे. १९५१ सालीं भारतामधील प्रेक्षणीय स्थळें पहाण्यासाठी ३,५०० अमेरिकन प्रवासी आले होते. १९५५ मध्यें सुमारें ११,००० प्रवाशांनीं भारताला भेट दिली. अमेरिकन प्रवाशांना जरूर ती माहिती देण्यासाठी भारत सरकारनें अमेरिकेंत दोन केंद्रें स्थापन केलीं आहेत.

**अमेरिकन वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक**—इराकच्या सरकारनें बगदाद येथें पोस्ट व टेलिग्राफ कचेरीसाठी एक भव्य इमारत बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी मि. फ्रँक राइट ह्या अमेरिकन वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक करण्यांत आली आहे. ह्याच वास्तुशास्त्रज्ञाचा सल्ला घेऊन इराकच्या सरकारनें एक प्रचंड नाट्यगृह बांधलें आहे.

**सोव्हिएट रशिआचा दौरा**—सिंद्री येथील खताच्या कारखान्यांतील चार हिंदी तंत्रज्ञ ६ महिन्यांचा दौरा करण्यासाठी रशिआला गेले आहेत. खताच्या कारखान्यांतील उत्पादनाची अद्यावत् पद्धति समजून घेण्यासाठी ते गेले आहेत. ह्या संबंधीच्या संशोधन संस्था, तांत्रिक संस्था व कारखाने ह्यांनाहि ते भेटी देतील व तेथील कार्यपद्धति समजाऊन घेतील.

**सर्वांत अधिक वेतन**—बेथलेहेम स्टील कॉर्पोरेशन ह्या अमेरिकेंतील पोलाद कारखान्यांच्या संघटनेचे अध्यक्ष मि. युजिन ग्रेस ह्यांना गेल्या वर्षीं अमेरिकेंतील कोणत्याहि माणसापेक्षा अधिक म्हणजे ४०½ लाखांपेक्षा अधिक रुपये वेतन मिळत होतें. पण कर वजा जातां त्यांना फक्त ७ लक्ष रुपयेच रहात असत.

**पश्चिम बंगालमधील तागाच्या गिरण्या**—पश्चिम बंगालमधील तागाच्या गिरण्यांची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारनें एक कमिटी नेमली होती. १९५१–५६ ह्या काळांत गिरण्यांतील कायम मजुरांच्या संख्येंत १९,००० हजारांची घट झाली. कामगारांना मिळणाऱ्या वेतनांत वृद्धि होऊन तें १९·६५ कोटी रुपयांवरून २४·५७ कोटी रुपयांपर्यंत वाढलें असें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे.

**तागाच्या बदली तांदूळ**—झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें पाकिस्तानला २८,००० टन तांदूळ देऊं करून त्याच्या बदली पूर्व पाकिस्तानांतील ताग घेण्याची तयारी दाखविली आहे. पाकिस्तान ह्या देवाणघेवाणीचा विचार करीत असून अशा प्रकारचे करार इतर कांहीं देशांशीं करणार असल्याचें समजतें.

**भारताला सुवर्णपदक**—जर्मनींतील म्युनिक ह्या शहरीं जर्मनींतील हस्तव्यवसायाच्या वस्तूंचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत भारतासह २१ देशांनीं भाग घेतला होता. प्रदर्शनांतील भारताचा मंडप फार लोकप्रिय झाला व भारतीय वस्तूंच्या उत्कृष्टतेचें कौतुक म्हणून एक सुवर्णपदक देण्यांत आलें.

**प्रायोगिक दूरदर्शन केंद्र**—दिल्ली येथें स्थापन करण्यांत येणाऱ्या प्रायोगिक दूरदर्शनकेंद्राचीं कांहीं उपकरणें अद्याप यावयाचीं आहेत. तज्ज्ञ नोकरवर्गाचें शिक्षणहि व्हावयाचें आहे. केंद्राची उभारणी चालू झाल्यापासून तें पूर्ण होण्यास १॥ वर्षांचा अवधी लागेल व त्यासाठी सुमारें ५ लाख रुपये खर्च येईल.

**मळ्यावरील कामगारांना बोनस**—भारताच्या ईशान्य कोपऱ्यांतील चहाच्या मळ्यावर काम करणाऱ्या कामगारांना १९५६ सालचें बोनस म्हणून दोन कोटी रुपये मिळणार आहेत. ह्या संबंधीच्या करारावर कामगारांचे प्रतिनिधी व मालक ह्यांनीं नुकत्याच सह्या केल्या आहेत.

**नवा साखर कारखाना**—आसाममध्यें जोऱ्हाटपासून १९ मैलांवर असलेल्या ठिकाणीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याच्या पायाभरणीचा समारंभ राज्याच्या मुख्य मंत्र्यांच्या हस्तें नुकताच झाला. अशा प्रकारचा हा आसाम राज्यांतील पहिलाच कारखाना होईल.

**विद्यार्थ्यांना प्रवासासाठी सवलत**—विद्यार्थ्यांचें सामान्य ज्ञान वाढून दृष्टि विशाल व्हावी म्हणून त्यांना प्रवासासाठी सवलती जाहीर करण्यांत आल्या आहेत. किमान ४०० विद्यार्थ्यांचा गट प्रवासास निघाल्यास त्यांना तिसऱ्या वर्गाचें निम्मेंच भाडें प्रत्येकीं द्यावें लागेल. झोपण्याची सोय हवी असल्यास मात्र संपूर्ण भाडें द्यावें लागेल.

तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## उद्योगधंद्यांना मध्यम मुदतीचीं कर्जे

### रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती

उद्योगधंद्यांना मध्यम मुदतीचीं कर्जे देण्यासाठी उभारण्यांत यावयाच्या संस्थांचें शेअर भांडवल खरीदण्याचा रिझर्व्ह बँकेला अधिकार देणारें बिल लोकसभेनें मंजूर केलें.

मोठ्या किंमतीच्या चलनी नोटांचा कायदेशीरपणा १९४६ च्या एका ऑर्डिनन्सनें रद्द केलेला होता. परंतु, रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याच्या हिशेबांत ह्या नोटांचें देणें अजून दाखविण्यांत येत होतें. देण्याची ही जबाबदारी नष्ट करण्याचें कामहि वरील बिलानें केलें आहे.

### रिझर्व्ह बँकेविषयीं अर्थमंत्र्यांच्या अपेक्षा

ह्या बिलावर भाषण करतांना, अर्थमंत्रि श्री. टी. टी. कृष्णम्माचारी म्हणाले:— "मध्यम मुदतीचीं कर्जे देणाऱ्या संस्थांचे संचालकांत फक्त बँकर्सचाच समावेश केला जाईल. तेच कर्ज देण्याचें काम करतील. ह्या संस्थांच्या चालकांत प्रत्यक्ष उद्योगधंद्यांशीं हितसंबंध असणारांना जागा मिळणार नाहीं. पूर्वी असें होई, कीं एकाद्या संचालकाचा एकाद्या (उदाहरणार्थ, कॉस्टिक सोडा) धंद्याशीं हितसंबंध असला, म्हणजे तोच जिन्नस उत्पादन करणाऱ्या दुसऱ्या कारखान्यास कर्ज देण्यास तो तत्पर नसे. अशा प्रकारास आतां आळा बसेल.

"नव्या संस्थांत एक्सचेंज बँकांनाहि स्थान देण्यांत आलें आहे, ह्याचें कारण त्यांनीं उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणावर कर्जे देण्याचें काम चालविलेलें आहे व त्यांचें सहकार्य आपल्या हिताचें आहे.

"रिझर्व्ह बँक ही सर्व आर्थिक बाबतींत सर्वोच्च संस्था झाली पाहिजे. तिला सरकारची आर्थिक व बँकिंगविषयक बाबतींत सर्वश्रेष्ठ सल्लागार बनविण्याचा माझा विचार आहे. रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेच्या वेळीं सरकारची स्वतःची व्यापारी बँक नव्हती. आतां स्टेट बँक सरकारची असल्यामुळें, व्यापारी स्वरूपाचीं कामें तिच्याकडे सोंपविलीं जावींत व रिझर्व्ह बँकेवरील ती जबाबदारी कमी व्हावी, अशी योजना करण्यांत येईल."

---

### बँकेंतील नोकरांनीं लेखण्या कानावर ठेवल्या

कानपूर येथील बँक ऑफ बिहारच्या एका नोकराची तेथून बदली करण्यांत आली. हा नोकर यू. पी. बँक एम्प्लॉईज युनियनच्या कार्यकारी मंडळाचा सभासद होता. ह्या बदलीचे विरुद्ध तक्रार व्यक्त करण्यासाठी बँकेच्या नोकरवर्गानें लेखणी कानावर ठेवून बसून रहाण्याचा प्रकार अवलंबिला आहे. ह्या संपाशी सहानुभूति व्यक्त करण्यासाठी कानपूर येथील २९ बँक कचेऱ्यांतील १,००० कामगारांनीं २५ मे रोजीं एक तास लेखणी कानावर ठेवली.

---

### आगाखानांच्या दुसऱ्या मुलाचा विवाह

आगाखानांचा दुसरा पुत्र, सद्रुद्दिन, ह्यानें आपल्या विवाहाचा बेत एका पत्रकारांच्या बैठकींत जाहीर केला आहे. त्याची वधू, निना डायर, ही एका जर्मन उमरावाची पूर्वींची पत्नी आहे. वराचें वय २४ व वधूचें वय २६ वर्षांचें आहे. वधू इस्लामी धर्म स्वीकारणार आहे.

---

### दि रत्नाकर बँक लिमिटेड, कोल्हापूर.

अहवालाचे वर्षांत, गेल्या वर्षाचे नफ्यांतील बाकी रु. ४५-५-६ जमेस धरून बँकेस एकंदर नफा ४०,१०२-७-२ झाला आहे. सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणें करण्यांत आली:—

| | रु. आ. पै |
|---|---|
| (१) रिझर्व फंड | १०,०००—०—० |
| (२) डिफर्ड शेअरवरील डिव्हिडंड | १,१४१—०—० |
| (३) इन्व्हेस्टमेंट घसारा फंड | १,०००—०—० |
| (४) कंटीजन्सी तरतूद फंड | १०,५००—०—० |
| (५) इन्कमटॅक्स देऊन, बाकी पुढील सालचे हिशेबांत घेणेचा. | १७,४६१—७—२ |
| एकूण | ४०,१०२—७—२ |

बँकेची सुरक्षितता वाढविण्याचे दृष्टीनें निरनिराळे रिझर्व फंड वाढविणेचा प्रयत्न व्हावा, असें रिझर्व बँकेनें सुचविलें आहे. त्यास अनुसरून चालू सालच्या निव्वळ नफ्यापैकी ५० टक्यापेक्षा अधिक रक्कम निरनिराळ्या तऱ्हेचे रिझर्व फंड वाढविण्यासाठी काढली आहे. व्यापारी उलाढालीच्या दृष्टीनें १९५६ साल बरें गेलें आहे. परंतु स्टाफ पगार व ऑडिटर्स फी यांमध्यें वाढ झाल्यामुळें निव्वळ नफा १९५५ सालापेक्षा कमी झाला आहे. बँकेचे निरनिराळे रिझर्व फंड योग्य प्रमाणांत वाढविण्याचे दृष्टीनें ऑर्डिनरी शेअर होल्डर्सना डिव्हिडंड देणेची शिफारस करणें चालू वर्षीं डायरेक्टरांना योग्य वाटलें नाहीं. डायरेक्टर बोर्डानेंहि आपल्या मेहेनतान्यांचा (रु. ३२५०/-) त्याग केला आहे. १९५६ सालचे अखेरी बँकेची रिझर्व बँकेकडून तपासणी झाली आहे व डायरेक्टरांच्या समजुतीप्रमाणें बँक लवकरच शेड्यूल्ड होईल अशी आशा आहे.

---

**काश्मिरी ग्रामोद्योगाच्या वस्तू**—काश्मिरमधील ग्रामोद्योगांत तयार करण्यांत आलेल्या कलापूर्ण वस्तू रशिआंत आयात करण्याच्या वाटाघाटी काश्मिरचें सरकार व रशिआचा प्रतिनिधी ह्यांच्यांत सुरू आहेत. वाटाघाटी यशस्वी झाल्यास काश्मिरमधील ह्या वस्तूंना रशिआंत फार मोठी बाजारपेठ लाभेल असें रशिअन प्रतिनिधींचें मत आहे.

**बँकेच्या अधिक शाखा**—आसाम विभागांत स्टेट बँक ऑफ इंडिआच्या बऱ्याच शाखा काढण्याचा कार्यक्रम आखण्यांत आला आहे. कार्यक्रम अमलांत आल्यावर १९६० च्या सुमारास आसामच्या ग्रामीण भागांत बँकेच्या २० तरी शाखा निघतील. सहकारी संस्था, छोटे उद्योगधंदे आणि पतपेढ्या ह्यांना ह्या शाखांचा विशेष उपयोग होईल.

**मोटारीच्या प्रवासास परवानगी**—ब्रिटिश नागरिकांना रशिआंत स्वतःच्या मोटारीनें फिरूं देण्याची मुभा देण्यांत आली आहे. मात्र त्यांना दोन ठराविक मार्गानींच प्रवास करतां येईल आणि आपल्या मोटारींत एक रशिअन दुभाषाला प्रवास चालू असेपर्यंत जागा द्यावी लागेल.

**छापखान्याची यंत्रसामुग्री**—छापखान्यांची यंत्रसामुग्री तयार करण्याचा कारखाना काढावयाचा नाहीं, असें भारत सरकारनें ठरविलें आहे. यंत्रसामुग्री तयार करण्याच्या इतर कारखान्यांना जरूर पडल्यास कारखान्याचें तांत्रिक साहित्य तयार करतां येईल. त्यासाठी खास कारखान्याची जरूर नाहीं असें सरकारचें मत झालें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ५ जून, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जगाच्या लोकसंख्येसंबंधींचें उपयुक्त वार्षिक

संयुक्त राष्ट्र–संघटनेनें लोकसंख्येविषयींचें आपलें वार्षिक प्रसिद्ध केलें आहे. वार्षिकांत जगांतील लोकसंख्येविषयीं अनेक प्रकारची उपयुक्त व विश्वसनीय माहिती संकलित करण्यांत आलेली आहे. वार्षिकाचा व्याप ७०० पानांवर पसरलेला असून सर्व देशांतील लोकसंख्येची आकडेवार माहिती देण्यांत आली आहे. ह्याला अपवाद फक्त रशिआचा आहे. लोकसंख्येची मोजदाद करतांना तिची वाढ, जन्म–मृत्यूचें प्रमाण, भाषा आणि धर्म ह्या मुद्यांना प्राधान्य देण्यांत आलेलें आहे. तथापि सर्व दृष्टीनें श्रम घेऊन सुद्धां लोकसंख्येची गणना निश्चित करतां येत नाहीं, हें स्पष्ट करण्यांत आलें आहे. लोकसंख्येविषयींच्या माहितींतील अपुरेपणाबद्दल एक स्वतंत्र प्रकरणच घालण्यांत आलें आहे. अमेरिकेसारख्या सुधारणेच्या शिखरावर असलेल्या देशांतहि गणनेंत थोडीबहुत चूक रहाते. कारण, अमेरिकेंतील लोक उद्योगधंद्याच्या निमित्तानें स्थलांतर करीत असतात. उलट, आग्नेय आशिआंतील कांहीं देशांत शिरगणती माहीतच नाहीं. ह्या भागांत दरवर्षी जितकीं मुलें जन्माला येतात त्यांपैकीं ९ टक्के मुलांचीच नोंदणी करण्यांत येते, असा अंदाज करण्यांत आला आहे. सुमारें ५ कोटी मातांना त्यांना होणाऱ्या अपत्यांची मोजदादच करण्यांत येत नाहीं. आर्थिक व सामाजिक प्रगति योजनाबद्ध रीतीनें करावयाची असेल तर लोकसंख्येसंबंधीची माहिती अधिक व्यवस्थित करण्यांत आली पाहिजे, असा निष्कर्ष वार्षिकांत काढण्यांत आला आहे.

तथापि, वार्षिकांत गोळा करण्यांत आलेली माहिती अत्यंत उपयुक्त आहे. जगांतील आजची लोकसंख्या सुमारें २ अब्ज, ७० कोटी आहे आणि ती दर तासाला ५ हजारांनीं, दर दिवसाला १ लाख, २० हजारांनीं आणि दर वर्षाला ४ कोटी, ३८ लाखांनीं वाढत आहे. १९५५ सालीं जगांतील लोकसंख्या दर हजारी ३४ ह्या प्रमाणांत वाढत होती. त्याच सालीं मृत्यूंचें प्रमाण दरहजारी १८ असें होतें. पूर्व युरोपांत बालमृत्यूंचें प्रमाण ७·७ टक्के होतें. पश्चिम युरोपांत तेंच प्रमाण ४·२१ टक्के होतें. लोकसंख्येच्या वाढीच्या वेगांत दक्षिण अमेरिकेचा क्रमांक पहिला लागतो. त्या भागांतील लोकसंख्या दरसाल २·६ टक्क्यांनीं वाढत आहे. तथापि आशिआंतील देशांत अधिक म्हणजे जगांतील एकूण लोकसंख्येच्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्या आहे. एकंदरींत पहातां जगांतील मृत्यूंचें प्रमाण कमी होत चाललेलें दिसून येतें. अविकसित देशांत सुद्धा हें प्रमाण घटलें आहे. ह्याचें मुख्य कारण म्हणजे आरोग्यविषयक उपायांचा सुधारलेला दर्जा. मृत्यूंचें प्रमाण कमी झाल्यामुळें दीर्घायुषी लोक साहजिकच वाढत आहेत. पण त्यांतहि फरक आहे. उत्तर अमेरिका आणि पश्चिम युरोप ह्या भूभागांत रहाणाऱ्या लोकांचें सरासरी आयुर्मान ७१ वर्षांचें आहे, तर भारतामधील लोकांची सरासरी अवधी ३४ वर्षे आहे. आर्थिक व्यवसायांत भाग घेणाऱ्या स्त्रियांची टक्केवारी हाइटी ह्या बेटांत सर्वांत अधिक म्हणजे ५४ टक्के आहे. तुर्कस्थान व बल्गेरिआ ह्या देशांतील प्रमाणहि असेंच आहे. उलटपक्षीं, दक्षिण अमेरिकेंत १० टक्के स्त्रिया अर्थोत्पादन करतात. ह्या बाबतींत सर्वांत शेवटचा क्रमांक पाकिस्तानचा आहे. पाकिस्तानांत ४ टक्के स्त्रियाच अर्थोत्पादन करतात.

---

## जनता विमा पॉलिसी

(१) विम्याची कमाल रक्कम १,००० रु.

(२) ठराविक वर्षे हप्ते भरावयाचे. किमान हप्ता वार्षिक १२ रु. किंवा मासिक १ रु.

(३) ३५ वर्षांखालील विमेदारांची वैद्यकीय तपासणी नाहीं. त्यावरील वयाच्या विमेदारांच्या तपासणीबाबत सोप्या अटी. ४५ वर्षांखालील लोकांनाच हा विमा मिळूं शकेल.

(४) कॉर्पोरेशनच्या कचेरीकडे हप्ता पाठविण्याचें कारण नाहीं. एजंट विमेदाराच्या घरीं जाऊन हप्ता घेतील व पावती देतील.

(५) ठराविक मुदतीनंतर विमेदारास विम्याची पूर्ण रक्कम दिली जाईल. मुदत संपण्याचे आंत दुर्दैवानें विमेदारास मृत्यु आला तर त्यानें लिहून ठेवलेल्याला रक्कम दिली जाईल. दोन्ही बाबतींत हप्ते वक्तशीर भरलेले असले पाहिजेत, हें उघड आहे. रकमेच्या भरपाईची भारत सरकारनें हमी घेतली आहे.

---

## सरकार लोकांचें सोनें घेणार तरी कसें ?

### किंमतीमधील तफावत

पंचवार्षिक योजनेसाठीं सरकारनें लोकांकडून सोनें विकत घ्यावें, अशी कल्पना जाहीर झाली होती. परंतु, सोन्याचा बाजारभाव आणि इंटरनॅशनल मोनेटरी फंडानें ठरवून दिलेला भाव ह्यांतील तफावतीमुळें ती कल्पना प्रत्यक्षांत आणणें सरकारला अशक्य आहे. इं. मो. फंडानें सोन्याची ठरविलेली किंमत तोळ्याला ६२ रु. ८ आ. आहे व त्यावरच रुपयाची चलन म्हणून किंमत ठरते. सरकारवर सोन्याचा हा दर बंधनकारक होतो.

---

### बँकेच्या इमारतीच्या पायांत रोमन अवशेष

लंडन येथील एका बँकेच्या इमारतीचा पाया खोदीत असतांना २,००० वर्षांपूर्वींचें रोमन साम्राज्याचे अवशेष सांपडले आहेत. मांडीं, लोखंडी किल्ली, चरखा, कांतडी पोशाख, कांचेचे पात्र, इत्यादि वस्तूंचा त्यांत समावेश आहे.

---

### राष्ट्रपतींचें उदाहरण

डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांनीं आपल्या मासिक तनख्यांत आपण होऊन १,००० रुपयांची कपात केली आहे व हा निर्णय सरकारला कळविला आहे.

# THE BHARAT INDUSTRIAL BANK

## Balance Sheet as

| 31-12-1955 Rs. As.Ps. | CAPITAL & LIABILITIES | Rs. As.Ps. | 31-12-1956 Rs. As.Ps. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital* | | |
| | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560 0 0 | |
| | 30005 Ordinary Shares of Rs. 50/- each. ... | 15,00,250 0 0 | 15,43,810 0 0 |
| | *Issued & Subscribed Capital* | | |
| | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560 0 0 | |
| | 15005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 7,50,250 0 0 | 7,93,810 0 0 |
| | *Called and Paid up Capital* | | |
| | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares @ Rs. 25/- each ... | 27,225 0 0 | |
| | 15005 Ordinary Shares @ Rs. 25/- each (out of which 5 shares are fully paid) ... | 3,75,250 0 0 | |
| | | 4,02,475 0 0 | |
| | Less calls unpaid ... | 2,290 0 0 | |
| | | 4,00,185 0 0 | |
| 4,00,185 0 0 | Add Forfeited Shares ... | Nil | 4,00,185 0 0 |
| 290 0 0 | *Calls in Advance* ... | | 290 0 0 |
| 1,07,000 0 0 | **2. Reserve Fund & Other Reserves** ... | 1,14,000 0 0 | |
| | Less amount transferred to loss on redumption of Government Securities ... | 9,000 0 0 | 1,05,000 0 0 |
| | **3. Deposits and Other Accounts:** | | |
| 22,58,642 0 6 | Fixed Deposits & Recurring Deposits ... | 23,20,436 14 3 | |
| 22,91,749 0 5 | Savings Bank Deposits ... | 25,50,515 5 2 | |
| 10,49,040 5 1 | Current Accounts, Contingency Accounts etc. ... | 11,08,916 1 4 | 59,79,868 4 9 |
| 55,99,431 6 0 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| Nil | (i) In India ... | Nil | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | Nil |
| | *Particulars* | | |
| | (i) Secured (against Pledge of G. P. Notes) Nil | | |
| | (ii) Unsecured Nil | | |
| 9,056 2 6 | **5. Bills Payable** ... | | 23,224 4 9 |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable** (As per contra) | | |
| 1,76,410 14 3 | (i) Payable in India ... | 1,58,657 13 3 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 1,58,657 13 3 |
| 51,044 8 9 | **7. Other Liabilities** ... | | 52,835 13 3 |
| Nil | **8. Acceptances, Endorsements and Other Obligations** per contra ... | | Nil |
| | **9. Profit and Loss: Account** ... | | |
| 25,357 9 0 | Profit as per last Balance-Sheet ... | 21,083 12 0 | |
| | Less appropriations: | | |
| | Reserve Fund 6,000 0 0 | | |
| | Investment Depreciation Fund 1,000 0 0 | | |
| | Dividend @ 6% on 6% G- R. P. Shares 1,225 0 0 | | |
| | Income-tax 9,161 2 0 | 17,386 2 0 | |
| | | 3,697 10 0 | |
| 21,083 12 0 | Add profit for the year brought from the Profit and Loss account (subject to depreciation and Income-tax) ... | 25,132 3 10 | 28,829 12 10 |
| 63,64,501 11 6 | Carried Over... | | 67,48,891 0 10 |

# LIMITED, POONA CITY

## on 31st December, 1956

| 31-12-1955 Rs. As.Ps. | PROPERTY & ASSETS | Rs. As.Ps. | 31-12-1956 Rs. As.Ps. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 4,97,217 4 3 | In hand and with Reserve Bank and State Bank (including foreign currency notes) ... | | 3,54,354 14 11 |
| | **2. Balances with other Banks (in current accounts);** | | |
| 4,20,951 11 9 | (i) In India ... | 1,53,816 14 1 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | 1,53,816 14 1 |
| 4,20,951 11 9 | | | |
| 1,00,000 0 0 | **3. Money at Call and Short Notice** ... | | 3,00,000 0 0 |
| | **4. Investments (at cost)** Govt. Securities of the face value : Rs. 24,18,100/- (Market value : Rs. 20,84,941/-) | | |
| 24,01,035 10 0 | (i) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments.... | 23,85,220 10 0 | |
| | (ii) Shares-Ordinary (at cost) | | |
| | [i] Fully Paid (Market value Rs. 17,780) | 21,823 8 0 | |
| 60 0 0 | [ii] Partly Paid (Market value Rs. 8,750) | 5,000 0 0 | |
| | (iii) Debentures or Bonds ... | Nil | |
| | (iv) Other investments ... | Nil | |
| | (v) Gold ... | Nil | 24,12,044 2 0 |
| 24,01,095 10 0 | | | |
| | **5. Advances** (other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the auditors). | | |
| | (1) *Loans, Cash Credits, Overdrafts, etc.* | | |
| 20,34,753 4 9 | (i) In India 25,62,680 2 1 | 25,62,680 2 1 | |
| | (ii) Outside India Nil | | |
| | (2) *Bills, Discounted and Purchased* (excluding Treasury Bills of the Central and State Governments) | | |
| 1,87,177 9 0 | (i) Payable in India 2,38,358 11 9 | | |
| | (ii) Payable outside India Nil | 2,38,358 11 9 | 28,01,038 13 10 |
| 22,21,930 13 9 | | | |
| | **Particulars of Advances :** | | |
| 14,14,943 15 5 | (i) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 19,38,406 9 10 | |
| 2,10,245 6 6 | (ii) Debts considered good for which the Banking company holds no other security than the debtors' personal security ... | 2,97,908 3 8 | |
| 5,41,126 7 10 | (iii) Debts considered good and secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors... | 5,00,302 6 5 | |
| 21,66,315 13 9 | | | |
| 55,615 0 0 | (iv) Debts considered doubtful or bad, not provided for. | 64,421 9 11 | |
| 22,21,930 13 9 | | 28,01,038 13 10 | |
| 1,09,217 8 11 | (v) Debts due by directors or officers of the Banking company or any of them either severally or jointly with any other persons ... | 57,356 7 2 | |
| Nil | (vi) Debts due by companies or firms in which the directors of the Banking company are interested as directors, partners or managing agents, or in the case of private companies, as members... | Nil | |
| 1,31,833 1 0 | (vii) Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors or managers or officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | 1,07,070 2 11 | |
| | (viii) Maximum total amount of advances, including temporary advances granted during the year to the Companies or firms in which the Directors of the Banking company are interested as directors, partners, or managing agents or, in the case of private companies, as members ... | Nil | |
| | (ix) Due from banking companies ... | Nil | |
| | **6. Bills Receivable, Being Bills For Collection** (as per contra) | | |
| 1,76,410 14 3 | (i) Payable in India ... | 1,58,657 13 3 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 1,58,657 13 3 |
| | Carried over ... | | 61,79,912 10 1 |

# THE BHARAT INDUSTRIAL BANK

**Balance Sheet as**

| 31-12-1955 Rs. As.Ps. | CAPITAL & LIABILITIES | Rs. As.Ps. | 31-12-1956 Rs. As.Ps. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 67,48,891 0 10 |
| | **10. Contingent Liabilities**<br>In respect of partly paid shares help by the Bank as investment Rs. 3,250 0 0<br>and held on behalf of constituents Rs. 2,350 0 0 | | |
| | *Notes*: (1) Depreciation for the year 1956 not taken into account. Rs. 12,958 0 0<br>(2) Liability for Taxation not provided Rs. 12,000 0 0 | | |
| 63,64,501 11 6 | Total ... | | 67,48,891 0 10 |

## *PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended on 31-12-1956*

| 31-12-1955 Rs. As.Ps. | EXPENDITURE | Rs. As.Ps. | 31-12-1956 Rs. As.Ps. |
|---|---|---|---|
| 1,22,594 11 8 | 1. Interest paid on deposits, borrowings, etc. ... | | 1,38,230 9 5 |
| 95,667 8 0 | 2. Salaries and Allowances and Provident Fund :— (including amount paid to Managing Directors Rs. 14,817-8-0) ... | | 1,01,396 11 0 |
| 1,16[illegible] 0 0 | 3. Directors' and Local Committee members' fees and allowances ... | | 1,280 0 0 |
| 11,183 5 3 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 11,579 15 9 |
| 511 2 6 | 5. Law Charges ... | | 480 0 0 |
| 5,365 8 9 | 6. Postage, Telegrams, and Stamps ... | | 5,810 9 9 |
| 700 0 0 | 7. Auditors' Fees ... | | 700 0 0 |
| Nil | 8. Depreciation on and Repairs to the Banking company's Property (for the year 1955) ... | | 13,411 0 0 |
| 6,302 8 0 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 7,440 12 9 |
| Nil | 10. Loss from sale of or dealing with non-banking assets ... | | 45 12 0 |
| Nil | 11. Loss on sale of investments in Govt, Securities ...<br>Less transferred from Reserve fund and other Reserves | 9,115 0 0<br>9,000 0 0 | 115 0 0 |
| 12,731 4 6 | 12. Other Expenditure : ... | | 5,477 6 3 |
| 21,083 12 0 | 13. Balance of Profit (subject to depreciation and Income-tax). ... | | 25,132 2 10 |
| 2,77,299 12 8 | Total ... | | 3,11,099 15 9 |

| 31-12-1955 Rs. As.Ps. | INCOME | Rs. As.Ps. | 31-12-1956 Rs. As.Ps. |
|---|---|---|---|
| | (Less Provision Made during the year for Bad and doubtful debts and other useful or necessary provisions) | | |
| 2,44,305 11 8 | 1. Interest and Discount ... | | 2,76,162 2 9 |
| 13,010 9 7 | 2. Commission, Exchange, and Brokerage ... | | 14,994 0 3 |
| 10,750 12 0 | 3. Rent ... | | 10,968 9 0 |
| Nil | 4. Net Profit on sale of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to Reserve or any particular Fund or Account) ... | | 1,088 0 9 |
| Nil | 5. Net Profit on revaluation of Investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to Reserve or to any particular Fund or Account) ... | | Nil |
| Nil | 6. Income from non-banking assets, and profit from sale of or dealing with such assets ... | | 144 6 0 |
| 9,232 11 5 | 7. Other receipts ... | | 7,742 13 9 |
| 2,77,299 12 8 | Total ... | | 3,11,099 15 9 |

*Notes* :—(1) Depreciation for the year 1956 Rs. 12,958 not taken into account.
(2) Incometax about Rs. 12,000 on profits of the year not provided.

# LIMITED, POONA CITY
## on 31st December 1956

| 31-12-1955 Rs. As.Ps. | PROPERTY & ASSETS | Rs. As.Ps. | 31-12-1956 Rs. As.Ps. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 61,79,912 10 1 |
| Nil | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations per contra :** ... | | Nil |
| | **8. Premises** (at cost) | | |
| 3,45,997 5 9 | As per last Balance Sheet ... | 3,75,170 12 9 | |
| 29,173 7 0 | Additions during the year ... | 1,088 6 0 | |
| 3,75,170 12 9 | | 3,76,259 2 9 | |
| 6,370 0 0 | Less Depreciation upto 31-12-1955 ... | 15,590 0 0 | 3,60,669 2 9 |
| 3,68,800 12 9 | | | |
| | **9. Furniture and Fixtures** (at Book value) ... | | |
| 60,763 3 1 | As per last Balance Sheet ... | 61,520 12 4 | |
| 792 9 3 | Additions during the year ... | 611 2 6 | |
| 61,555 12 4 | | 62,131 14 10 | |
| 35 0 0 | Less sales during the year ... | 50 0 0 | |
| 61,520 12 4 | | 62,081 14 10 | |
| 7,218 4 7 | Less Depreciation upto 31-12-1955 ... | 10,506 4 7 | 51,575 10 3 |
| 54,302 7 9 | | | |
| | *Safe Deposit Vault Equipment* (at cost) | | |
| 37,080 2 0 | As per last Balance Sheet ... | 37,080 2 0 | |
| Nil | Additions during the year ... | Nil | |
| 37,080 2 0 | | 37,080 2 0 | |
| 931 2 0 | Less depreciation up to 31-12-1955 ... | 1,834 2 0 | 35,246 0 0 |
| 36,149 0 0 | | | |
| | **10. Other Assets Including Silver** ... | | |
| 2,924 8 0 | Sundry Assets ... | 3,119 8 0 | |
| 22,046 6 0 | Interest accrued on Govt. Securities ... | 22,332 0 0 | |
| 17,777 9 0 | Income-Tax deducted at source ... | 19,149 9 0 | |
| 25,290 6 3 | Stock of Printing (at cost) ... | 25,328 0 0 | |
| 501 1 9 | Library (at cost) ... | 548 12 9 | |
| 670 9 0 | Stamps in Stock ... | 506 5 0 | |
| ... | Branch adjustments ... | 1,174 2 0 | |
| 17,460 9 0 | Due from Bank in liquidation (not provided for) ... | 17,460 9 0 | |
| 972 0 0 | Advance payment of Municipal Tax ... | 972 0 0 | 90,590 13 9 |
| 87,643 1 0 | | | |
| Nil | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** (Market Value) ... | | 30,896 12 0 |
| 63,64,501 11 6 | Total ... | | 67,48,891 0 10 |

**M. K. Ternikar**
*Accountant*

**N. N. Kshirsagar, R. B. Salvekar** } *Managing Directors*

**K. P. Joshi,** *Chairman*
**K. M. Mahajan,** *Vice Chairman.*

**B. B. Walvekar**
**Mrs. Indumatibai R. Phadke**

**R. B. Girme, R. P. Damodare** } *Directors*

### AUDITOR'S REPORT

We have audited the annexed Balance Sheet of the Bharat Industrial Bank Limited, as on 31st December, 1956 and also the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date, in which are incorporated the unaudited returns of six Branches not visited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and section 227(5) of the Companies Act, 1956 the Balance-Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule to the Companies Act, 1956. The Accounts are therefore drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that :

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory; (b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank; (c) In our opinion, proper books of accounts as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Branches of the Bank; (d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns; (e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for banking companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1956 and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upon that date.

Poona
7th February, 1957

**Khare & Co.**
Chartered Accountants.

## बँकेच्या उत्पन्नावरील इनकमटॅक्स

**रोख्यावरील व्याजास ८ वें कलम लागू; १० वें नाहीं.**

बँकेनें मिळविलेल्या रोख्यांवरील व्याजावर इनकम टॅक्स कायद्याच्या ८ व्या कलमाखालीं कर आकारणी करण्यांत यावी; १० व्या कलमाखालीं नाहीं, असें सुप्रीम कोर्टानें ठरविलें आहे.

युनायटेड कमर्शिअल बँक लि. च्या बाबतींत कलकत्ता हाय-कोर्टानें असा निवाडा केला होता कीं, बँकेच्या व्यवहारांतील नफ्यास १० वें कलम लागू आहे. त्यावर बँकेनें सुप्रीम कोर्टाकडे अपील केलें होतें.

१९४५-५५ च्या, बँकेच्या हिशेबांतील वरील दोन्हीं उत्पन्नें वेगळीं करून, इनकमटॅक्स अधिकाऱ्याने बँकेच्या १४,९५,८२६ रुपये उत्पन्नावर कर आकारला होता. त्यावर्षी व्याजाचें उत्पन्न २३,६२,८१५ रु. झालें होतें आणि बँकेच्या व्यवहारांत ८,८६,९७२ रु. तोटा आला होता. योग्य त्या हिशेबानें व रोख्यावरील व्याजांतून व्यवहारांतील तोटा उणें करून इनकम टॅक्स अधिकाऱ्यानें १८,९५,८२६ रुपये उत्पन्न करपात्र ठरविलें होतें. त्यापूर्वीच्या वर्षी ३,२१,९२९ रु. तोटा होता, तो रोख्या-वरील व्याजांतून वजावाट करून टाकला होता.

बँकेचें म्हणणें असें होतें, कीं रोख्यांची खरेदी-विक्री करणें हा बँकेच्या नित्याच्या व्यवहाराचा एक भाग आहे; तेव्हां रोख्यांवरील व्याजाचें उत्पन्न आणि ह्या व्यवहाराचें उत्पन्न ह्यांत फरक करतां कामा नये; २४ व्या कलमाप्रमाणें तीं एकत्र केलीं पाहिजेत. इनकमटॅक्स अधिकाऱ्यानें ठरविलें, कीं आलेला तोटा, "व्यवहार" ह्या सदरांत पडतो, म्हणून २४ (२) ह्या कलमाचा फायदा त्याला मिळूं शकणार नाहीं.

कलकत्ता हायकोर्टाकडे मतासाठीं बँकेतर्फे इनकमटॅक्स अपेलेट ट्रायब्यूनलनें जे प्रश्न सोपविले, त्यावर हायकोर्टानें मत दिलें, तें बँकेच्या विरुद्ध गेलें. म्हणून, बँकेनें सुप्रीम कोर्टाकडे हायकोर्टाचें सर्टिफिकिट मिळवून अपील केलें.

सुप्रीम कोर्टानें असा निवाडा केला कीं असेसीची प्राप्ति ही सर्व प्रकारच्या उत्पन्नाची बेरीज असते; १ ते १० कलमांनीं कर कसा आकारावा हें सांगितलें आहे. तीं कलमें स्वतंत्रपणें विचारांत घ्यावयाचीं (एक्सक्ल्यूझिव्ह) आहेत. 'रोख्यावरील व्याज' ही बाब ८ व्या कलमाखालीं येते, तेव्हां त्यावर व्याज आकारणी केलीच पाहिजे. १० व्या कलमाशीं त्याचा संबंध नाहीं. म्हणून १० व्या कलमाखालील तोटा ८ व्या कलमाखालील उत्पन्नांतून वजा करतां येणार नाहीं." २४ (२) कलमाखाली सेट-ऑफ मिळण्याबाबत बँकेच्या मागणीचा विचार कलकत्ता हायकोर्टानें करावा असें ठरवून सुप्रीम कोर्टानें तें प्रकरण त्या हायकोर्टाकडे पाठविलें.

### मॉस्को ते पीकिंग आगगाडी

मॉस्को तें पीकिंग ह्या ५,००० मैलांचा प्रवास करणाऱ्या उतारूंच्या आगगाडीची वहातूक २१ मे, १९५७ रोजीं सुरू झाली. ह्या प्रवासाला १० दिवस लागतील. रेल्वे रस्ता बांधण्या-च्या कामीं रशियन व चिनी इंजिनिअर्सनीं सहकार्य केलें.

### लष्करी खात्यासाठीं साडेपांच कोटी रु.ची इमारत

लष्करी खात्याच्या मध्यवर्ती इमारतीसाठी ५½ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. नवी दिल्ली येथें ही इमारत उभारली जाईल.

## खाणींसाठी लागणारी यंत्रसामुग्री

भारताचें औद्योगीकरण त्वरेनें साध्य करण्यासाठी पंचवार्षिक कार्यक्रम आंखून त्यांची अंमलबजावणी करण्यांत येत आहे. औद्योगीकरणाच्या कार्यक्रमांत भारी उद्योगधंद्यांना फार महत्त्वाचें स्थान आहे. कारण, त्यांच्या विकासावरच ग्राहकांना लागणाऱ्या वस्तूंचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याची शक्यता अवलंबून असते. भारी एंजिनिअरिंगचे उद्योगधंदे उभारण्यासाठीं पोलादाचें व कोळशाचें उत्पादन वाढवावें लागतें. म्हणून असेरीस लोखंड व कोळशासारख्या खनिजांचें उत्पादन पायाभूत ठरतें. भारता-मधील खाणींना लागणारी यंत्रसामुग्री निर्माण करण्यासाठी जरूर तो सल्ला देण्याच्या हेतूनें भारत सरकारनें एक तांत्रिक कमिटी स्थापन केली आहे. कमिटीनें खाणींची यंत्रसामुग्री तयार कर-ण्याची एक तपशीलवार योजना तयार करावयाची आहे. ह्या योजनेसाठी सुमारें १८ कोटी रुपये लागतील, असा अंदाज करण्यांत आला आहे. त्यापैकी ११ कोटी रुपये परदेशीय हुंडणावळीच्या स्वरूपांत खर्च करावे लागतील. रशियानें भारताला ६० कोटी रुपयांचें जें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे त्यापैकी कांहीं भाग ह्या कामासाठीं वापरला जाईल. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरच्या वर्षांत अगर तिसऱ्या कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षांत प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल. संकल्पित कार-खान्यांत प्रथम १५,००० टनांपर्यंत यंत्रसामुग्री निर्माण करण्यांत येईल. उत्पादन दरवर्षी वाढविण्यांत येऊन सुमारें ५ वर्षांच्या अवधींत तें ३०,००० टनांपर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे.

### खर्चावरील व संपत्तीवरील कराला विरोध

भारताच्या अर्थमंत्र्यांनीं अंदाजपत्रकांत ज्या करवाढीच्या सूचना केल्या आहेत, त्यांना म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सनें आपला विरोध व्यक्त केला आहे. ह्यासंबंधीं चेंबरनें केलेल्या ठरावांत पुढीलप्रमाणें विचार व्यक्त केले आहेत. अर्थमंत्र्यांनीं केलेल्या करवाढीच्या सूचना चिंताजनक आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीसाठीं पैसा उभारला पाहिजे हें मान्य करतां येईल. पण त्याचबरोबर देशाच्या अर्थव्यवस्थेवर नव्या करवाढीचा काय परिणाम होईल त्याचाहि विचार करणें आव-श्यक आहे. भारताची अर्थव्यवस्था विकसित झालेली नाहीं. अशा परिस्थितींत संपत्तीवर व खर्चावर कर बसविणें योग्य होणार नाहीं. कारण, ह्या करांमुळें खाजगी भांडवलाच्या विभागावर आघात होईल आणि भांडवलाचा संचय करण्याच्या वृत्तीवर विरजण पडेल. ज्या ज्या व्यक्तीला व्यक्तिगत स्वातंत्र्याची व आर्थिक स्वातंत्र्याची कदर असेल त्या त्या व्यक्तीला खर्चा-वरील करामुळें चिंता वाटल्याखेरीज राहणार नाहीं. कराविषयीं-च्या योजना ह्या नोकरशाहीच्या हातांत छळणुकीचीं साधनें होण्याची शक्यता आहे. म्हणून नोकरशाहीच्या हातीं अशा प्रकारची सत्ता देऊं नये. नव्या सूचनांत सिमेंट व पोलाद ह्यांच्यावरील अबकारी कर २०० ते ३०० टक्क्यांनीं वाढविण्यांत आला आहे. अशा प्रकारच्या जबर करांमुळें किंमती वाढून दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा खर्च निदान ५०० कोटी रुपयांनीं तरी वाढेल. ग्राहकांना लागणाऱ्या रोजखपाच्या वस्तूं-वरील अबकारी करहि वाढविण्यांत आले आहेत. त्यामुळें अगो-दरच दरिद्री असलेल्या लोकांची अवस्था अधिकच विपन्न होईल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ४२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.